University Grants Commission

Western Regional Office

Ganeshkhind, Pune-411 007

# Submission Final Report and Utilization Certificate of **Minor Research Project**

In the Faculty of Social Science

(HOME ECONOMICS)

Project Title

## "Empowerment of Women in Melghat through training for development cotton industry."

FINAL REPORT UTILIZATION CERTIFICATE Annexure-III To VI

F-No. 23-881/09(WRO) D 26-Aug-2009

By


**Dr. Sujata B. Sabane**

Deptt. of Home Economics

Shri Shivaji College, Amravati


2015

Amount Sanctioned Rs.1,15 ,000/-

University Grants Commission
Western Regional office
Ganeshkhind, Pune-411007

**Summary**

# A MINOR RESEARCH PROJECT

In the faculty of social science
(Home-Economics)

Project Title

Empowerment of Tribal Women in Melghat through traning for developing cottage Industries

(मेळघाट या आदिवासी क्षेत्रातील स्त्रियांचे गृहउद्योगाच्या प्रशिक्षणामार्फत होणारे सक्षमीकरण)

By
Dr. Sujata Balwant Sabane
Shri Shivaji College, Amravati ४४४ ६०३

## Enclosure-3

## Summary of the Finding

ग्रामीण अर्थव्यवस्था ही ग्रामीण भागातील स्वयंरोजगार करणाऱ्या महिलांच्या कार्यक्षमतेवर अवलंबून असते. पर्यायाने आदिवासी क्षेत्रात आदिवासींच्या रोजगारावर अवलंबून राहील आदिवासी स्त्रियांनी स्वयंरोजगारावर वाटचाल केल्यास त्याचे बहुसंख्य परिणाम सकारात्मक राहतील. गैर आदिवासींकडून त्यांचे होणारे शोषण त्यांच्यावरील लैंगिक अत्याचार, फसवणूक, अपहरण या सारख्या अनेक दुर्दैवी गोष्टींना आळा बसतो.

आदिवासी स्त्रिया स्वयंरोजगाराची निर्मिती करु शकतात व त्यातून इतर अनेक हातांना काम मिळवून देऊ शकतात. त्याचे दुहेरी फायदे होतील एक तर आदिवासी स्त्रियांना आर्थिक उत्पन्न प्राप्त होईल व दुसरे म्हणजे आदिवासी कलेची जोपासना करता येईल आदिवासी स्त्रियांना आर्थिक उत्पन्नाचे मार्ग सापडल्यास त्यातून आदिवासी महिलांचे सक्षमीकरण साध्य करता येईल व आदिवासी स्त्रियांच्या विकासाला एक नवी दिशा मिळेल.

भारतीय समाजातील आदिवासी जमातीचे स्थान वैशिष्ट्यपूर्ण आहे. १९३५ च्या कायद्यात भारत सरकारने आदिवासी करीता मागास जमाती असा शब्दप्रयोग केला जातो. भारतीय राज्यघटनेत १९५० मध्ये यांच्यासाठी अनुसुचीत जमाती असा नामोल्लेख केलेला आहे. विंध्याचल सातपुडा पर्वतात भारतातील सर्वात जास्त संख्येने आदिवासी राहतात. ज्योती सेन यांनी आदिवासी जमातीतील स्त्रिया व्यापारामध्ये महत्त्वपूर्ण भूमिका निभवितात ते अनेक प्रकारच्या कार्यात संलग्न राहून एकट्याच आपले पालन पोषण करतात.

आदिवासी स्त्रीयांच्या स्थानाचे जे आदर्श चित्र पारंपारीक पद्धतीने सांगितले जाते. त्याला छेद देणारे हे एक नवे वास्तव्य आहे. आदिवासी समाजातील मातृसत्ताक पद्धतीमुळे ती प्रधान आहे. मुक्त आहे. स्वतंत्र आहे, निर्णय क्षमता, आर्थिक स्वातंत्र्य, सामाजिक, धार्मिक स्वातंत्र्य तिच्याजवळ आहे. ती सुदृढ आहे असे संगितले जाते. पण प्रत्यक्षात आता ही ती दुय्यम स्थानावर आहे, ती बंदी आहे, व्यवस्थेची पुरुष प्रधानतेची बळी आहे. ती आर्थिक, सामाजिक, कौटुंबिक निर्णय घेवू शकत नाही. धार्मिक कार्यात सहभागी होण्यास तिच्यावर बंदी आहे. ती शोषित आहे. पिडीत आहे. तिच्या आरोग्याचा प्रश्न फारच भयावह आहे. अनेक अर्थाने कुपोषीत आहे. तिचे नैसर्गिक जीवन व आरोग्यावर घाला घालणारी आजची परिस्थिती आहे.

निसर्गाच्या सानिध्यामध्ये जंगल, दऱ्या-खोऱ्या, पर्वतीय क्षेत्रात आदिम काळापासून वास्तव्य करणारा समाज म्हणजे आदिवासी समाज. या समाजाची वेगळी भाषा, बोली, वेगळी संस्कृती आहे.

आदिवासी समाजात स्त्रियांची आर्थिक संदर्भात भूमिका फारच महत्त्वपूर्ण असते. आदिवासी अर्थव्यवस्था प्रामुख्याने निसर्गावर आधारित असते. त्यांच्यातील आर्थिक कार्याची वाटणी पुढील पद्धतीने केलेली असते.

अन्नसंकलन (कंदमुळे, फळ, फुल) शिकार स्थायी-अस्थायी शेती करणे, शेती व औद्योगिक मजुरी, वाणिज्य व्यापार-लाकूड, डिंक, लाख, जडीबुटी जंगलातून आणून विकणे, नांगर हाकणे इ. शारिरीक कष्ट व जंगलात भटकंतीचे काम स्त्रिया करतात त्यामुळे आदिवासी स्त्रियांचे व त्यांच्या मुलांचे आयुष्य अत्यंत चिंताजनक आहे. शासनाने आदिवासी स्त्रियांकरीता अनेक योजना तयार केल्या असल्या तरी शिक्षणाचा अभाव, भ्रष्टाचार आणि कामकाजात

होणारा विलंब ह्या नाना कारणांमुळे योजना त्यांच्या पर्यंत पोहचत नाहीत जर हे काम एखाद्याने करावयाचे ठरविले तर शासकिय अधिकारी त्यांना मदत करीत नाही.

आरोग्याच्या रक्षणाकरीता केवळ दोनच उपाय करण्यात येतात. एक म्हणजे- मन:देहिक तर दुसरा बनस्पतीइगन यापैकी ह्या आत्मा, भुतप्रेत आणि काल्पनिक देवदेवतांना शरण जातात तसेच ओझा पंडित भोंदुबाबा आदिंच्या दुष्टचक्रात सापडलेल्या असतात. अंधविश्वास परंपरा व धार्मिक विश्वासात ह्या स्त्रिया अशा प्रकारे बळी पडतात. मेळघाटमध्ये कुपोषणावर संशोधन केले असता असे निदर्शनास आले की, आदिवासी स्त्री ही जंगलात दिवसभर राहत असल्यामुळे त्यांच्या अतिरिक्त शारीरीक कष्टामुळे स्वतःवर व बालकांच्या प्रकृतीवर परिणाम होतांना आढळला. घरी राहुन जर गृहउद्योग म्हणजे स्वतःच्या शेतात व रानात मिळणाऱ्या रानमेव्यापासून टिकाऊ पदार्थ तयार करण्याचे प्रशिक्षण दिल्यास त्यांना स्वयंरोजगार उपलब्ध करुन बालकांचे व स्त्रियांचे कुपोषण होणार नाही हे या विषयाचे महत्त्व आहे.

**विषय निवडीची कारण मिमांसा :**

आदिवासी क्षेत्रामध्ये मेळघाट भागामध्ये कुपोषणावर भरपुर संशोधन झालेले आहे. आदिवासी स्त्रियांमधील व बालकांमधील कुपोषण नाहीसे होण्याकरीता अनेक शासनाच्या योजना, निमशासकिय संस्था, समित्या गठीत करुन सर्वतोपरी सार्वजनिक प्रयत्न व विविध कार्यक्रम राबविले जात आहे. हे सर्व प्रयत्न चालू असतांना आई व बालकांमधील कुपोषणाचा, बालमृत्यूच्या स्थितीत विशेष यश प्राप्त झालेले नाही. आजपर्यंत या विषयाशी निगडीत संशोधनाचा आधार घेवून काढलेले निष्कर्ष व शिफारशी यांचे मुल्यमापन करण्यात येईल. कुपोषणाकरीता आदिवासींची आर्थिक परिस्थिती सुधारणे व स्त्रिया घरी राहणे ह्याकरीता प्रयत्न करणे आवश्यक आहे. याकरीता नविन संशोधन होणे गरजेचे आहे जेणे करुन आधुनिक

काळात स्त्रियांना प्रशिक्षण, बालसंगोपन, आहार व आरोग्य शिक्षण, अंधश्रद्धा इ. मुख्य बाबींवर प्रकाश टाकता येईल.

**उद्दिष्टये :**

१) आदिवासी स्त्रियांच्या आरोग्य व आहारविषयक ज्ञान अभ्यासणे.

२) आदिवासींच्या शेतात होणाऱ्या उत्पन्नाचा आढावा घेणे

३) आदिवासी स्त्रिया व पुरुष शारीरीक कामाबद्दलचा आढावा घेणे.

४) आदिवासींच्या कुटुंबाची साक्षरतेबाबत माहिती तपासणे

५) आदिवासी स्त्रि व बालकांमधील कुपोषणा मागील कारणांचा शोध घेणे.

६) शेतात व जंगलात होणाऱ्या कच्च्या मालापासून टिकाऊ पदार्थ तयार करणे.

**गृहितके :**

गृहउद्योग प्रशिक्षणामार्फत आदिवासी महिलांचे आर्थिक सक्षमीकरण होईल.

**संशोधन पद्धती :**

आदिवासी क्षेत्रातील चिखलदरा तालुक्यातील स्त्रियांच्या आर्थिक व आरोग्यविषयक स्थितीचे अध्ययन करण्याकरीता संशोधन करण्यात येईल. संशोधनाची पद्धत, संशोधन क्षेत्र व त्यामुळे करावयाची कार्य ही त्यांच्या उद्दिष्टावर अवलंबून असल्यामुळे प्रस्तुत संशोधन द्वितीय सामुग्रीद्वारे माहिती मिळवून संशोधन कार्य पूर्ण केल्या जाईल. प्राथमिक माहितीचे संकलन करण्यासाठी संशोधन क्षेत्राची निवड करुन आवश्यक माहिती गोळा केली जाईल. तसेच चिखलदरा तहसिल मधील ५० प्रतिशत नमुना गावांची निवड करुन नमुना आदिवासी स्त्रियांची अनुसुचीद्वारे माहिती मिळवून अध्ययन करण्यात येईल. अनुसुची, मुलाखत तंत्र, निरिक्षण, प्रत्यक्ष प्रशिक्षण, सरकारी अहवाल, कागदपत्रे इ. माध्यमातून सामुग्रीचे संकलन करुन संकलीत माहितीचे सादरीकरण तथ्यांचे निर्वचन केले जाईल.

१) अभ्यास क्षेत्राची निवड :

प्रस्तुत विषयाच्या संदर्भात अभ्यास करतांना अमरावती जिल्ह्यातील चिखलदरा तहसिलची निवड करण्यात आलेली आहे. या संशोधनाच्या अंतर्गत चिखलदरा संबंधीतच अभ्यास करण्यात आलेला आहे. या क्षेत्रात आतापर्यंत अशा प्रकारचे संशोधन झालेले नसल्यामुळे अशा प्रकारच्या संशोधनाची नितांत आवश्यकता भासली. या अभ्यासासाठी बहुस्तरीय नमुना निवड पद्धतीने (Multistage random sampling method) चिखलदरा तहसिलची निवड करण्यात आली. निवडतांना लॉटरी पद्धतीचा उपयोग करण्यात आला. या संशोधनासाठी निवडण्यात आलेल्या दहा गावांची नावे खालीलप्रमाणे दिली आहे.

| अ.क्र. | गाव | लोकसंख्या |
|---|---|---|
| १ | आडनदी | ६५९ |
| २ | भिलखेड १ | ६३१ |
| ३ | मनभंग | ४३२ |
| ४ | पिली | ४४१ |
| ५ | घटांग | २१४ |
| ६ | सलोना | ११७० |
| ७ | बिहाली | ७४८ |
| ८ | भुलोरी | ४१० |
| ९ | बोरी | ३०७ |
| १० | सेमाडोह | १६०२ |

२) **संशोधन आराखडा :**

संशोधन कार्याची योजना आखणे म्हणजेच संशोधनाचा आराखडा होय. संशोधनाचा आराखडा तयार केल्यामुळे संशोधनात सुसूत्रता येते. तसेच वेळ, शक्ती आणि पैसा यांचा अपव्यय होत नाही. संभाव्य समस्या व अडचणींची संशोधकाला अगोदरच कल्पना येत असल्यामुळे त्या दुर करण्याची त्याला योजना आखता येते. म्हणूनच संशोधन आराखडा तयार करणे ही शास्त्रीय संशोधनातील एक महत्त्वाची पायरी समजली जाते.

श्रम, वेळ आणि पैसा यांचा महत्तम उपयोग करुन संशोधनाच्या उद्दिष्टांच्या पुर्ततेसाठी तथ्यांचे संकलन, विश्लेषण आणि निर्वचन करुन सिद्धांताची मांडणी करण्यासाठी निर्णय घेण्याच्या नियोजन प्रक्रियेला संशोधन आराखडा असे म्हणतात. (डॉ. बोधनकर, प्रा. अलोणी).

संशोधन आराखडा तयार करण्यासाठी सर्वप्रथम संशोधन कार्याची उद्दिष्टे निश्चित करण्यात आलीत. अध्ययनाचे क्षेत्र ठरविण्यात आले व त्यासाठी माहिती संकलित करण्यात आली व त्याकरीता संशोधन विषयक साधने, तंत्रे, कसोटी वापरण्यात आली.

३) **निदानात्मक संशोधन आराखडा :**

विशिष्ट सामाजिक समस्येच्या निदानाचा शोध घेण्याच्या संशोधन कार्यास निदानात्मक संशोधन असे म्हणतात.

सामाजिक समस्येच्या कारणांचा किंवा निदानाचा शोध घेणे तसेच मिळालेल्या ज्ञानाच्या आधारे एखाद्या विशिष्ट समस्येच्या निराकरणाचे उपाय शोधून काढणे हे या संशोधन आराखड्याचे उद्देश आहेत.

या आराखड्याचा उपयोग समस्या दुर करण्यासाठी केला जातो. समस्येला सोडविण्यासाठी उपाययोजना निर्मिती व नंतर तिचे क्रियान्वयन केले जाते. याचाच अर्थ हा आराखडा सैद्धांतिक तसेच व्यवहारिक अशा दोन्ही स्तरावर वापरता येतो.

**निष्कर्ष :**

आदिवासी महिला ह्या रोजगार मिळवण्यासाठी जंगलात दिवसभर राहतात त्यामुळे त्यांना शारीरीक कष्ट पुरुषांच्या तुलनेत जास्त प्रमाणात होत असल्याचे आढळले. आदिवासी भागात अल्प वयात लग्न होतात माता ही कमी वयात होतात. तसेच दोन मुलांमधील अंतर अतिशय कमी असल्याचे आढळून आले. काही ठिकाणी माता व अपत्य हे दोन्ही कुपोषित असल्याचे आढळले. मुलांची संख्याही दोन पेक्षा जास्त आहे. आर्थिक परिस्थिती अतिशय हलाखीची आहे. ५० % कुटुंबाचे दरमहा उत्पन्न ३०००/- रु. पेक्षा जास्त नसल्याचे आढळले. ३० टक्के लोकांचे २०००/- रु. पर्यंत २०% लोक असे आहेत की त्यांचे ३०००/- रु. च्या वर उत्पन्न असल्याचे आढळले. गरोदर माता व बालकांच्या बाबतीत आहार व आरोग्य विषयक जागृती महत्त्वाची आहे.

१) आदिवासी स्त्रियांना आहाराविषयी अज्ञान असल्याचे तसेच आरोग्य विषयी अंधविश्वासु जास्त असल्याचे आढळले. दवाखाण्यापेक्षा भुमका (भोंदूबाबा) फुक पाणी यावर विश्वास जास्त असल्याचे दिसून आले.

२) शेतात पिकणाऱ्या तसेच शासनाने राबविलेल्या योजनेमार्फत मिळणाऱ्या धान्याचा आहारामधील वापर करण्याचे महत्त्व त्यांना माहित नाही.

३) आदिवासींच्या शेतात सोयाबीन, तिळ, कुटकी, गहु, तुर, बाजरी इ. उत्पन्न ते घेतात परंतु त्याचा पाहिजे त्याप्रमाणात आहारात योग्य वापर करत नाही.

४) स्वतःची शेती नसली तरी पहाडावरील खालीजागेमध्ये शेती करीत असल्याचे आढळते.

५) आदिवासी पुरुषापेक्षा आदिवासी स्त्रीया शारीरीक कष्ट जास्त प्रमाणात करतात.

६) रोजगार मिळविण्यासाठी दिवसभर जंगलात राहत असल्याने लहान मुलांना घरी सोडून जातात. त्यामुळे पाच वर्षावरील मुलांमधील कुपोषणाचे प्रमाण कमी आहे परंतु ० ते ३ वयोगटातील मुलांमध्ये कुपोषण जास्त आहे.

७) ३० ते ४० वर्षे वयोगटामधील स्त्रियांचे साक्षरतेचे प्रमाण अतिशय कमी आहे. परंतु किशोरवयीन मुलींमध्ये साक्षरतेचे प्रमाण थोडे सुधारले आहे.

८) शिक्षणाला फारसे महत्त्व नसुन अल्पवयात विवाह करण्यात येतात. लग्नानंतर शिक्षण घेत नाही.

९) आदिवासी स्त्री ही अल्पवयात माता होतांना आढळले. दोन पेक्षा जास्त अपत्य व दोन मुलांमधील अंतर कमी या सर्व बाबी कुपोषणाला जबाबदार असल्याचे आढळले.

१०) आहार विषयी भ्रामक कल्पना

११) रोजगाराचा अभाव हेही एक अत्यंत महत्त्वाचे कारण आहे.

१२) आर्थिक परिस्थिती सुधारल्यास स्त्रीला शारिरीक कष्ट कमी होवून घरी राहिल्यामुळे मुलांकडे लक्ष केंद्रीत होईल व कुपोषणास आळा बसेल.

१३) गृहउद्योगामार्फत प्रशिक्षीत करतांना आदिवासी स्त्रीयांची संख्या ही कमी प्रमाणात होती. पण त्यांना स्वतः जावून समजून सांगून, विश्वासात घेवून त्यांना एकत्रित करण्यात आले व प्रशिक्षण देण्यात आले. या प्रशिक्षणाला स्त्रीयांकडून चांगला प्रतिसाद मिळाला.

**उपाययोजना/ शिफारसी :**

१) महिलांच्या सक्षमीकरणासाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांच्या कार्यान्वयनाकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

२) स्वयम रोजगार प्रशिक्षण केंद्र मेळघाटातील प्रत्येक क्षेत्रात सुरु करण्यात यावे.

३) आदिवासी महिलांना स्वयंरोजगार निर्मितीसाठी उद्योगाकरीता लागणाऱ्या कर्जाविषयी सविस्तर माहिती देण्यात यावी.

४) शासन आणि आदिवासी यांच्यामध्ये दुवा म्हणून काम करणाऱ्या व्यक्तीची नेमणूक करण्यात यावी.

५) आदिवासी लघुउद्योगांना आणि कुटीरउद्योगांना उत्तेजन देणे.

६) आदिवासींचे कल्याण या दृष्टीकोनातून गृहउद्योगामार्फत तयार वस्तूंच्या विक्रीची सोय करण्यासाठी बाजारपेठ उपलब्ध करुन देण्यात यावी.

७) सेवा अंतर्गत प्रशिक्षणात प्रात्यक्षिक कार्यावर अधिक भर देण्यात यावा.

८) एकात्मिक बालविकास सेवा योजनेचे उद्देश व महत्त्व लाभार्थी व सेविकांना प्रत्यक्ष कार्यक्षेत्रात जावून पटवून देण्यात यावे यासाठी अधिकारी वर्गाने मदत करावी.

९) १५ ते ४५ वर्ष वयोगटातील महिलांना पोषण व आरोग्य शिक्षण देणे गरजेचे आहे.

१०) बालविकास प्रकल्प अधिकारी, पर्यवेक्षीका, अंगणवाडी सेविका आरोग्य विभाग यांच्या माहितीत ताळमेळ असणे गरजेचे आहे.

११) कमी वयात विवाह, दोन अपत्यांमधील अंतर दोनपेक्षा जास्त अपत्य याबाबत प्रयत्न करणे आवश्यक आहे.

१२) बाळंतीनीने बाळाला टाकून दिवसभर जंगलात गेल्याने बाळावर होणारा परिणाम याबाबतीत त्यांना माहिती देण्यात यावी.

१३) त्यांच्यात शेतात पिकणाऱ्या धान्यापासून पदार्थ करणे शिकवावे

१४) शासनाने रोजगार उपलब्ध करुन त्यांच्या मुलांची संगोपनाची जबाबदारी त्यांच्या वरच सोपवावी म्हणजेच त्यांच्या मुलांचे संगोपन करणे ही शासनाची जबाबदारी आहे हा दुराग्रह दूर करावा.